# **Positive Stories of Nagpur Rural Police**

## **नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
## **दिनांक १९/०५/२०१६ (गुरुवार)**

### **ट्रक ड्रायव्हरचा खुन करून लुटणारे आरोपी २४ तासाच्या आत गजाआड**
### **स्थानिक गुन्हे शाखेची (ना.ग्रा.)धडक कार्यवाही**

दिनांक १७/०५/२०१६ रोजी एच.एन.आर. कंपनीचा ट्रक क्र एमएच-३१/ डी.एस. -११७७ घेवुन ट्रक **चालक नामे - रामु सकाराम पालीयार्ड वय ५२ वर्षे रा. बंधम, वाकडी पो.स्टे. नेरडींगुंडा जि. अदिलाबाद (ए.पी**) हा नागपुर येथुन माल आणण्याकरिता मालाचे नगदी १,६०,०००/- रू घेवुन राजनांदगाव (छ.ग.) येथे जाण्याकरिता भंडारा रोडने आपला ट्रक घेवुन जात असता यातील अज्ञात आरोपीने त्यास धारदार शस्त्राने गळा कापुन खुन करून त्याचे जवळील नगदी १,६०,०००/- रू. जबरीने हिसकावुन पळुन गेल्याचे फिर्यादी नामे - नितीन गणेश हटवार रा.नागपुर तोंडी रिपोर्टवरून अपराध क्र. १८१/१६ कलम ३९७, ३०२ भादविचा गुन्हा पो.स्टे. मौदा येथे दाखल झाला.

सदर गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने पोलीस अधीक्षक नागपुर (ग्रामीण), यांनी स्थानिक गुन्हे शाखेला सदर गुन्हयाच्या संमातर तपास करून गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लगेच गुन्हयाच्या तपासाला सुरूवात करून घटनास्थळापासुन तर सदर ट्रक चालकाच्या कंपनीपर्यत सर्व ठिकाणी भेटी देवुन सदर घटनेदरम्यान संबधीत असलेल्या प्रत्येक व्यक्तीला सखोल विचारपुस केली. तसेच गुप्त बातमीदाराचे जाळे त्या परीसरात पसरवुन माहिती घेण्यास सुरवात केली.

अशा प्रकारे तपास करित असतांना विश्वसनीय गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, ट्रक चालकाच्या एच.एन.आर. कंपनीमध्ये काम करणारा मुख्य आरोपी नामे क्र. १) रोहीत पंचराज सिंग, वय १९ वर्ष, रा. मकरढोकडा, नागपुर या व्यक्तीने त्याच्या अन्य दोन साथीदारासंह सदर गुन्हा केला आहे. अशा खात्रीशीर मिळालेल्या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी रोहित पंचराज सिंग यास आज दिनांक १९/०५/२०१६ रोजी दुपारी ताब्यात घेवुन त्यास सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली, असता त्याने पैशाकरिता आपल्या दोन साथीदारासह गुन्हा केल्याची कबुली दिली.

तसेच आरोपी रोहीत याचे उजवे दंडावर जखम असल्याचे पोलीसांच्या लक्षात आले. याबाबत त्याला विचारपुस केली असता, त्याने दिनांक १७/०५/२०१६ रोजी तो ऑफीसमधुन घरी जात असताना गोरेवाडा बायपासवर त्यास २ अज्ञात इसमांनी अडवुन चाकु मारला आणि त्याठिकाणाहुन स्वत: पळुन आला. त्यानंतर गिटटीखदान, नागपुर येथील एका खाजगी हॉस्पीटलमध्ये इलाज करून, पोलीस स्टेशन गिटटीखदान येथे घटनेची माहिती दिल्याचे त्याने सांगीतले. परंतु त्यास सखोल विचारपुस करता त्याने ट्रक चालकास ठार करतांना झालेल्या झटापटीमध्ये त्याचा साथीदार ओरापी नामे क्र. २) अमित ब्रिजलाल तिवारी याचे हातातील चाकु त्यास लागल्याचे कबुल केले. मात्र खाजगी दवाखान्यात इलाज करतांना तेथे विचारपुस करण्यात आल्याने मी गोरेवाडा बायपासवर २ इसमांनी चाकु मारल्याची बनावट घटना सांगीतली आहे. असे आरोपी नामे क्र. १) याने कबुल केले.

तसेच ट्रक चालकास ठार करून लुटतांना त्याचे साथीदार आरोपी नामे क्र. २) अमित ब्रिजलाल तिवारी, वय १९ वर्ष, रा. सुरेंद्रगड, गुप्ता चौक नागपुर ३) राधेश्याम दौलतप्रसाद मिश्रा, वय २२ वर्ष, रा. सुरेंद्रगड बंजरग चौक ,नागपुर येथे असल्याचे सांगीतले, यावरुन त्यानांही सुध्दा लगेच स्था. गु. शा.च्या पथकाने ताब्यात घेवुन विचारपुस करता त्यांनी सुध्दा सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

वरील तिन्ही आरोपीतांनी ट्रक चालक हा पैसे घेवुन माल आणण्याकरिता निघाला असता तेव्हाच त्याचा पाठलाग सुरू करून ट्रक नागपुर शहराचे बाहेर जाताच नागपुर मौदा रोडवरील हल्दीराम कंपनीचे समोरून जात असतांना आरोपी क्र. १) रोहीत सिंग याने तो त्याच कंपनीत काम करत असल्याने ट्रक चालका सोबत असलेल्या ओळखीचा फायदा घेवुन ट्रक चालकास तुझे परमिट राहीले आहे. असा बहाना सांगुन ट्रक थांबविला व परमिट देण्याच्या बहानाने कॅबीनमध्ये चढला. तसेच त्याचे मागोमाग त्याचे अन्य २ साथीदार आरोपी क्र. २) अमित तिवारी व ३) राधेश्याम मिश्रा हे सुध्दा कॅबीनमध्ये चढले. या तिघांनी मिळुन ट्रक चालकास चाकुने वार करून ठार केले. व त्याचे जवळील नगदी १,६०,०००/-रु लुटुन पळुन गेले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण), श्री. अनंत रोकडे, अपर पोलीस अधिक्षक श्री. नरसिंग शेरखाने यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा.ना.ग्रा चे पोलीस निरीक्षक सतीश गोवेकर, सपोनि. पुरूषोत्तम अहेरवार, अजबसिंग जारवाल, सफौ रमेश चहारे, पोहवा राजेंद्र सनोडीया, मायकल डेनीयल, प्रमोद बन्सोड, चापोहवा शैलेश बनोदे, नापोशि. मदन आसतकर, दिलीप लांजेवार, शैलेश यादव, सुरेश गाते, पोशि. अमोल नागरे, राधेश्याम कांबळे, विशाल चव्हाण, मपोशि किर्ती हरडे, नम्रता बघेल स्थानिक गुन्हे शाखा ना.ग्रा चेतन राऊत, सायबर सेल ना.ग्रा यांनी कार्यवाही केली.



## <u>स्थानिक गुन्हे शाखा नागपूर (ग्रामीण) ची धडक कारवाई,</u>
## <u>ट्रक चोरी करणारी टोळी गजाआड</u>

दिनांक १६/०५/२०१६ रोजी फिर्यादी नामे - आशीफ रफीक खान, रा. चनकापूर कॉलनी यांनी खापरखेडा पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविली की, त्यांचे मालकीचा ट्रक क्र. सीजी - ०४/जे.ए. - ९५४६ किंमती अंदाजे ३,००,०००/- रु. चा कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेला आहे.

सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर (ग्रामीण) यांचेकडे सोपविण्यात आल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने परिसरात शोध घेवून आरोपी क्र. १) अशफाक युसुफ खान, वय ३० वर्ष, रा. कामठी , २) राजु शिवपाल सुर्यवंशी, वय ३० वर्ष, रा. कन्हान, ३) शंकर जयराम मेश्राम, वय ४७ वर्ष, रा. कामठी ४) राजेश पंजाबराव गडधे, वय ४९ वर्ष, रा. कन्हान, ५) किफायत अली उर्फ युसुफ अली, वय ३६ वर्ष, रा. नागपूर ६) समीर खान करीम खान, वय ३७ वर्ष, रा. मोमीनपूरा, नागपूर यांना ताब्यात घेवून विचारपूस केली असता यांनी सदरचा ट्रक चोरी करुन आरोपी क्र. ६ ला विकला. व त्याने सदर ट्रक आपल्या गोडाऊनमध्ये कापून वेगवेगळे पार्टस् केले. असे सांगीतल्याने त्याचे जवळुन सदर ट्रकचे संपूर्ण सुट्टे पार्टस् जप्त करुन आरोपी व मुद्देमालासह पुढील कार्यवाही करीता पोलीस स्टेशन खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे, अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. स्थागुशा.चे पो.नि. सतिश गोवेकर, कर्मचारी रमेश चहारे, लक्ष्मीप्रसाद दुबे, सुरज परमार, सुनिल मिश्रा, अश्विन बैस, राशीद शेख, शैलेश यादव, रोहनकर, भोयर, चालक ज्ञानेश्वर पाटील यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

